गायत्री सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.
पत्ता :-स.नं.२८२,प्लॉट नं.७२/७८,तानाजी नगर,चिंचवड,पुणे.४११ ०३३
नोंदणी क्र.:-पी.एम.ए./एच.एल.आय./एच.एस.जी./टी.सी./१२१६/८७-८८

# पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

गायत्री संस्थेची पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभा दिनांक ०७.१०.२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता संस्थेच्या आवारामध्ये आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस सर्व सभासद उपस्थित होते. सभेच्या सचिवांनी श्री.शैलेश कुलकर्णी यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत करून सदर सभेमधील खालील विषयांवर चर्चा सुरू करण्यासाठी संस्थेचे प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी यांना पुढील विषय चालु करण्यासाठी संस्थेच्या वतीने अनुमती देण्यात आली.

विषय क्रमांक ०१ :- संस्थेच्या पुर्नबांधणी प्रकल्पाबाबत प्राथमिक निर्णय घेणेबाबत.
ठराव क्रमांक ०१ :- श्री.संजय सुर्यवंशी यांनी प्रथम सभासदांना सहकार खात्याच्या ४ जुलै २०१९ च्या परिपत्रकाबाबत विस्तृत माहिती दिली. सदर प्रक्रिया चार टप्प्यात विभागली गेली आहे व प्रत्येक टप्प्याबाबत विस्तृत विवेचन त्यांनी सभेपुढे केले.त्यावर सभासदांनी वेगवेगळया शंका विचारल्या एकूण सर्व चर्चा सकारात्मक पध्दतीने झाली तसेच सभासदांकडून मांडण्यात आलेल्या शंकांना योग्य पध्दतीने सकारात्मक दृष्टिकोनाने शंकासमाधान करण्यात आले. व याचा विचार करताना सभासदांचा पुर्नबांधणी करण्यासाठी कौल असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार उपस्थित सभासदांपैकी १०० टक्के सभासदांची पुर्नबांधणी प्रस्तावास प्राथमिक मंजुरी असल्याचे सांगण्यात आले.

अशा रितीने पुर्नबांधणीप्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात आला.

सुचक:-श्री.विजय देशमुख

अनुमोदक:- सौ.अलका र.इनामदार

ठराव सर्वसंमत

गायत्री सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
नोंदणी क्र.
पीएमए/(एचएलआय)/एचएसजी/
(टिसी)/१२१६/८७-८८/
दि. १-३-८८
..., प्लॉट नं. ७२ व ७८, चिंचवड, ...

विषय क्रमांक ०२ :- सदर पुर्नबांधणी प्रस्तावाच्या कार्यवाहीबाबत पुर्नविकास समिती नेमणे व त्यांना अधिकार देणेबाबत.

ठराव क्रमांक ०२ :- सहकार खात्याने ४ जुलै २०१९ रोजी संस्था इमारत पुर्नविकास करणेसाठी विशेष परिपत्रक काढण्यात आले. त्यानुसार त्यातील आवश्यक बाबींची पुर्तता करण्यासाठी, सदर बाबत आवश्यक माहिती गोळा करणे, वेगवेगळया एजन्सीची माहिती घेणे, त्यांच्याकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रक तसेच निविदा मागविणे, या सर्व गोष्टीवरील उल्लेख केलेल्या परिपत्रकातील आवश्यक बाबींची पुर्तता करणेकामी कार्यवाही करणेबाबत संस्थेची पुर्नविकास समिती व व्यवस्थापक समितीस अधिकार देण्याबाबत सदर ठरावाद्वारे सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सदर समिती पुढीलप्रमाणे :-

इमारत पुर्नविकास समिती

| सभासदांची नावे | पद |
|---|---|
| १. श्री.शैलेश कुलकर्णी | अध्यक्ष |
| २.श्री. महेंद्र वराळे | सचिव |
| ३. श्री.केदार देव | सदस्य |
| ४. श्री.भागवत तळेले | सदस्य |
| ५.श्री.गोपाळ कुलकर्णी | सदस्य |
| ६.श्री.सुरेश पाटील | सदस्य |
| ७. श्री.जिग्नेश देशमुख | सदस्य |

सुचक:- श्री.सुरेश पाटील

अनुमोदक:-श्री.प्रदिप पुरोहीत

ठराव सर्वसंमत

विषय क्रमांक ०३ :- सदर प्रकल्पाच्या कार्यवाहीसाठी प्रकल्प सल्लागार व निर्णय घेणेबाबत.

ठराव क्रमांक ०३ :- सदर विषयाबाबत सहकार खात्याच्या परिपत्रकानुसार आवश्यकतेनुसार वेगवेगळया एजन्सीज् नेमणे, प्रोफेशनल सल्ला घेणे, आवश्यक ती कागदपत्रे तयार करून घेणे, आवश्यक त्या पध्दतीचा अवलंब करणे यासाठी लागणारे सर्व मार्गदर्शन त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींकडून घेणे आवश्यक आहे, त्याचे महत्व तसेच त्याबाबतच्या आर्थिक बाबी या सर्व गोष्टी मा.

गायत्री सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
नोंदणी क्र.
पीएनए/(एचएलआय)/एचएसजी/(टिसी)/१२१६/८७-८८/
दि. १-३-८८
२८२, प्लॉट नं. ७२ व ७८, चिंचवड, पुणे-१९.

पदाधिकाऱ्यांकडून सभासदांपुढे मांडण्यात आल्या सभासदांकडून याबाबत वेगवेगळी माहिती विचारण्यात आली. तसेच काही शंका उपस्थित करण्यात आल्या. परंतु त्या सर्व शंकांचे योग्य पध्दतीने व आवश्यक माहिती पुरवून समाधान करण्यात आले. त्यानुसार प्रकल्प सल्लागार एजन्सी नेमणेबाबत सर्व सभासदांचे एकमत झाले. व त्यानुसार संस्थेकडे आलेल्या निविदेनुसार मेसर्स.डि. जी.असोसिएटस् (सोसायटी प्लस) या संस्थेची निवड सदर सभेमध्ये एकमताने करण्यात आली. तसेच पुर्नबांधणी प्रकल्पाअंतर्गत सर्व प्रोफेशनल व्यक्तिंची टिम यामध्ये काम करणार आहे व त्यानुसार सदर कामाची एकूण प्रोफेशनल फी रू.४,००,०००/- ठरविण्यात आले. सदर रक्कम निविदेनुसार वेगवेगळया टप्प्यांमध्ये देण्यात येईल.

सुचक:-श्री.शैलेश कुलकर्णी

अनुमोदक:-श्री.प्रमोद पानसे

ठराव सर्वसंमत

विषय क्रमांक ०४ :- संस्थेच्या इमारत पुर्नविकाससंबंधीच्या कार्यक्रमाची रूपरेषा सादर करणे.

ठराव क्रमांक ०४ :- श्री.संजय सुर्यवंशी यांनी सभेपुढे इमारत पुर्नविकाससंबंधिच्या कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. त्यामध्ये पहिल्या दोन टप्प्यांच्या 1.Feasibility Report कार्यवाहीच्या स्वरूपाबाबत माहिती दिली व त्याबाबतच्या कार्यवाहीचे अधिकार रिडेव्हलपमेंट कमिटी व प्रकल्प सल्लागार यांना देण्यात आले. सदर प्रोसेसची कार्यवाही पुर्ण करून साधारण दोन ते तीन महिन्यांत विशेष सर्वसाधारण सभा घेऊन कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात येईल.

सुचक:- श्री.सुरेश पाटील

अनुमोदक:-श्री.प्रदिप पुरोहीत

ठराव सर्वसंमत

यानंतर पुनर्विकास समितीच्या वतीने सभेसाठी उपसिथत राहिलेल्या सर्व सभासदांचे, आणि संस्थेचे प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी यांचे संस्थेच्या वतीने आभार मानले आणि आजची सभा संपल्याचे जाहीर केले.

Soc. Round Seal     Chairman     Secretary




गायत्री सहकारी गृहरचना संस्था मर्यादित

सेक्रेटरी     चेअरमन